सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

(सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३१)

# मुंबईचा हिंदूंच्या सार्वजनिक पूजे-अर्चेची ठिकाणे (प्रवेश अधिकृत करणे) अधिनियम, १९५६

(३ नोव्हेंबर २००६ पर्यंत सुधारित)

**(BOMBAY ACT NO. XXXI OF 1956)**

# The Bombay Hindu Places of Public Worship (Entry Authorization) Act, 1956

*(As modified up to 3rd November, 2006)*

व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, पुणे यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[किंमत रु. ३/-]

# सन १९५६ चा मुंबई अधिनियम ३१[१]

## [ मुंबईचा हिंदूंच्या सार्वजनिक पूजे-अर्चेची ठिकाणे (प्रवेश अधिकृत करणे) अधिनियम, १९५६ ] †

[२८ मे १९५६]

या अधिनियमामध्ये पुढील आदेश व अधिनियम यांद्वारे फेरबदल व सुधारणा करण्यात आल्या आहेत :-

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६.

**हिंदूंच्या सर्व वर्गांना आणि घटकांना सार्वजनिक पूजे-अर्चेची ठिकाणे खुली करून देण्यासाठी अधिक चांगली तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** हिंदूंच्या सर्व वर्गांना आणि घटकांना सार्वजनिक पूजे-अर्चेची ठिकाणे खुली करून देण्यासाठी अधिक चांगली तरतूद करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे. :-

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, "मुंबईचा हिंदूंच्या सार्वजनिक पूजे-अर्चेची ठिकाणे (प्रवेश अधिकृत करणे) अधिनियम, १९५६" असे म्हणावे.

[२][ (२) तो संपूर्ण मुंबई राज्यास लागू आहे.]

१९५८ चा मुंबई ३६.

(३) तो, [३][पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात] राज्य शासन, राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून नेमील त्या दिनांकास [४][अंमलात येईल; आणि मुंबईचा हिंदूंच्या सार्वजनिक पूजे-अर्चेच्या जागांबाबत (प्रवेशाधिकार व्याप्ती वाढण्याबाबत) अधिनियम, १९५७ याअन्वये तो मुंबई राज्याच्या ज्या भागास लागू केला आहे त्या भागात तो, राज्य शासन, त्याच रीतीने राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून नेमील त्या इतर दिनांकास अंमलात येईल.]

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,–

(क) " सार्वजनिक पूजे-अर्चेचे ठिकाण" याचा अर्थ, जे ठिकाण–मग ते मंदिर म्हणून किंवा इतर कोणत्याही नावाने ओळखण्यात असो–तेथे कोणतेही धार्मिक कार्य किंवा प्रार्थना करण्यासाठी हिंदू,

---

[१] उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी **मुंबई शासकीय राजपत्र,** असाधारण, १९५६, भाग पाच, पृ. १९१ पहा.

[२] सन १९५८ चा मुंबई अधिनियम ३६, कलम ३ (अ) द्वारे मूळ पोटकलमाऐवजी हे पोटकलम दाखल केले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ब) (१) द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ब) (२) द्वारे "अंमलात येईल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

† हा अधिनियम, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६ च्या प्रारंभाच्या लगतपूर्वी मुंबई राज्याच्या ज्या भागाला लागू नव्हता त्या भागाला तो लागू करण्यात आला. (सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६ चे कलम २ पहा.)

जैन, शीख किंवा बौद्ध यांना किंवा त्यांच्या कोणत्याही घटकास किंवा वर्गास किंवा त्यांच्या हितार्थ वाहिलेली असेल किंवा त्यांनी सर्वसाधारणपणे वापरलेले असेल असे कोणत्याही व्यक्तीच्या मालकीचे ठिकाण, असा समजावा; आणि तेथे, अशा कोणत्याही ठिकाणाला लागून असलेल्या किंवा जोडलेल्या सर्व जमिनीचा आणि उपांगभूत मंदिरांचा आणि ज्यांचे पाणी पवित्र मानण्यात येते किंवा स्नानासाठी किंवा पूजे-अर्चेसाठी वापरण्यात येते अशा कोणत्याही पवित्र तळ्यांचा, विहिरींचा, झऱ्यांचा आणि जलप्रवाहांचा समावेश होतो;

(ख) हिंदूंचे "घटक" किंवा "वर्ग" यांत, हिंदूंच्या कोणत्याही विभागाचा, पोटभागाचा, जातीचा, पोट-जातीचा, पंथाचा किंवा संप्रदायाचा समावेश होतो.

हिंदूंची मंदिरे हिंदूंच्या सर्व वर्गांना व घटकांना खुली करणे.

३. त्या त्या वेळी अंमलात असलेली रूढी, परिपाठ किंवा कायदा, किंवा न्यायालयाचा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश किंवा कोणत्याही संलेखात असलेला कोणताही मजकूर विरुद्ध असला तरीही, सर्वसाधारणपणे हिंदूंना किंवा त्यांच्या कोणत्याही घटकाला किंवा वर्गाला खुले असलेले सार्वजनिक पूजे-अर्चेचे प्रत्येक ठिकाण हिंदूंच्या सर्व घटकांना आणि वर्गांना खुले असले पाहिजे; आणि ज्या रीतीने व ज्या मर्यादेपर्यंत कोणत्याही घटकाच्या किंवा वर्गाच्या इतर कोणत्याही हिंदूंना अशा सार्वजनिक पूजे-अर्चेच्या जागेत प्रवेश करण्याचा, त्या जागेत पूजा-अर्चा करण्याचा किंवा प्रार्थना करण्याचा किंवा धार्मिक कार्य करण्याचा अधिकार असेल. त्याच रीतीने व त्याच मर्यादेपर्यंत कोणत्याही घटकाच्या किंवा वर्गाच्या कोणत्याही हिंदूंना अशा जागेत प्रवेश करण्यास किंवा तेथे पूजा-अर्चा करण्यास किंवा प्रार्थना करण्यास किंवा कोणतेही धार्मिक कार्य करण्यास प्रतिबंध किंवा अडथळा करता कामा नये किंवा त्यास परावृत्त करता कामा नये.

शास्ती.

४. (१) जो कोणी, कलम ३ चे उल्लंघन करून,–

(क) सार्वजनिक पूजे-अर्चेची जागा म्हणून वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही हिंदू मंदिरात प्रवेश करण्यास, पूजा-अर्चा करण्यास किंवा प्रार्थना करण्यास किंवा कोणतेही धार्मिक कार्य करण्यास हिंदूंतील कोणत्याही वर्गाच्या किंवा घटकाच्या व्यक्तीस प्रतिबंध करील, किंवा

(ख) अशा कोणत्याही व्यक्तीस, ती वर सांगितलेल्या कृत्यांपैकी कोणतेही कृत्य करीत असताना छेडखानी करील, दुखापत करील, त्रास देईल, किंवा अडथळा करील किंवा अडथळा करवील किंवा अडथळा करण्याचा प्रयत्न करील किंवा छेडखानी, दुखापत, त्रास किंवा अडथळा करण्याची धमकी देऊन भयाकूल करील किंवा परावृत्त करील त्याला,

अपराधसिद्धीनंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाचशे रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) या कलमातील कोणताही मजकूर "अस्पृश्यता" पाळण्याच्या संबंधात लागू आहे, असे समजता कामा नये.

अपराधास अपप्रेरणा देणे.

५. जो कोणी, या अधिनियमाखाली येणाऱ्या कोणत्याही अपराधास अपप्रेरणा देईल त्यास त्या अपराधासाठी तरतूद केलेली शिक्षा होईल.

दिवाणी न्यायालयांच्या अधिकारितेची मर्यादा.

६. कोणत्याही दिवाणी न्यायालयाने, कोणत्याही दाव्यातील किंवा कामकाजातील दावा किंवा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश देणे किंवा बजावणे या अधिनियमाच्या तरतुदींशी कोणत्याही रीतीने विसंगत होईल तर, असा कोणताही दावा किंवा कामकाज दाखल करता कामा नये किंवा चालू ठेवता

कामा नये किंवा असा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश देता कामा नये किंवा असा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश संपूर्णतः किंवा अंशतः बजावता कामा नये.

१८९८ चा ५. ७. फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ यात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखाली येणारा प्रत्येक अपराध दखलपात्र असेल आणि असा प्रत्येक अपराध न्यायालयाच्या परवानगीने आपसात मिटवता येईल. अपराध दखलपात्र व आपसात मिटवण्याजोगे असणे.

१९५५ चा २२. ८. या अधिनियमाच्या तरतुदींमुळे अस्पृश्यता (अपराध) अधिनियम, १९५५ किंवा या अधिनियमात तरतूद केलेल्या कोणत्याही बाबीसंबंधी त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा यांच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचे अल्पीकरण होते असे समजता कामा नये. सन १९५५ चा अधिनियम क्रमांक २२ आणि इतर कायदे यांची व्यावृत्ती.

❖❖❖